# सभासद कल्याण ठेव योजना

## श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या,कोल्हापूर.

यांचेकडे विनंती अर्ज की,

आपल्या पतसंस्थेकडे सर्वसाधारण सभा व मा.सहकार आयुक्त व निबंधकसोा सहकारी संस्था पुणे यांचे मंजूरीनुसार सभासद कल्याण ठेव योजना सुरु करणेत आली असुन सदर ठेव योजनेमध्ये मी सहभाग घेत आहे

माझे व्यक्तिगत तपशील

नाव - श्री /सौ./श्रीमती ----------------------------------------

सध्याचा पत्ता - ----------------------------------------

----------------------------------------

कायमचा पत्ता- ----------------------------------------

------ ----------------------------------------

शाखा - ----------------------------------------

----------------------------------------

वारस - ----------------------------------------

दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक -

आपल्या पतसंस्थेचे या योजनेबाबतचे सध्या अस्तित्वात असणारे व वेळोवेळी फेर-फार होणारे नियम मला बंधनकारक असुन त्याप्रमाणे वागणेचे मी कबूल करतो व या योजनेचे मासीक वर्गणी कपातीचे संमतीपत्र मी संस्थेस या संमती पत्राने देत आहे.

वेळोवेळी बदल झालेल्या वारसांची नोंद मी करत जाईन.माझे हायातीनंतर माझी रक्कम संस्थेचे येणे असणारी बाकी वजा करुन नमुद केलेल्या वारसास मिळावी.यदाकदाचीत संस्थेकडे भरावयाची रक्कम ही मला देय असणारे रक्कमेपक्षा जास्त असेल तर सदरची देय रक्कमेसाठी माझे वारस व माझी हरएक ईस्टटेमधुन वसुल करणेचा अधिकार संस्थेस राहील.तरी सदरचे खाते सुरु करावे अशी नम्र विनंती.

सही

ठिकाण -

दिनांक -

अर्जाप्रमाणे सभासद कल्याण ठेव योजनेत खाते सुरु करणेत यावे. दिनांक -

सेक्रेटरी

## सभासद कल्याण ठेव योजना

१) नांव : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, कोल्हापूर या संस्थेच्या सभासदांसाठी सभासद कल्याण ठेव योजना असे नांव राहील.

२) उद्देश : संस्थेचे सभासदांमधील मयत कर्जदार सभासदांचे कर्जबाकी वसुलीसाठी व आर्थिक मदत होणेसाठी मयत सभासदांचे पश्चात वारसांना आर्थिक सहाय्य व्हावे व कर्ज फेड सुलभ व्हावी तसेच कर्ज नसणारे सभासदांचे वारसांना आर्थिक सहाय्य व्हावे. त्याचप्रमाणे संस्थेचे मयत सभासदांचे बाबतीत वसुलीसाठी सहाय्य व्हावे व जामिनदार यांना मयत सभासदांचे जामिनकी बोजा मधून जबाबदारी कमी होणेसाठी सहाय्य व्हावे. सदरची योजना ऐच्छिक राहील.

३) रक्कम उभारणी :

१) भाग घेणारे सभासदांनी प्रती माहे रु. १००/- प्रमाणे ठेवीसाठी वर्गणी जमा केली पाहिजे.

२) सदरची वर्गणी प्रती माहे मासिक वसुलपत्रातून वसूल केली जाईल किंवा रोखीने जमा घेतली जाईल.

३) जे सभासद वसुल पगारातून रक्कम पाठवत नाहीत व त्यांचे कर्ज खाते आहे अशा सभासदांची वर्गणी कर्जास नावे लिहून जमा केली जाईल.

४) योजनेचा लाभ : सभासदांचे पश्चात वारसांना मिळणारे लाभ रकमेचा तपशील पुढीलप्रमाणे-

१) १२ महिन्याचे रु. १,२००/- वसुलीनंतर सदर सभासद रु. ५०,०००/- रकमेच्या लाभास पात्र राहील.

२) २४ महिन्याचे रु. २,४००/- वसुलीनंतर सदर सभासद रु. १,००,०००/- रकमेच्या लाभास पात्र राहील.

३) ३६ महिन्याचे रु. ३,६००/- वसुलीनंतर सदर सभासद रु. १,५०,०००/- रकमेच्या लाभास पात्र राहील.

४) ४८ महिन्याचे रु. ४,८००/- वसुलीनंतर सदर सभासद रु. २,००,०००/- रकमेच्या लाभास पात्र राहील.

५) ६० महिन्याचे रु. ६,०००/- वसुलीनंतर सदर सभासद रु. २,५०,०००/- रकमेच्या लाभास पात्र राहील.

५. सदर ठेवीमध्ये संस्थेची वर्गणी सदरील वर्षाचे उत्पन्नाचे १% इतपत राहील.

६. योजनेमध्ये भाग घेतलेले सभासदांनी आपली वर्गणी नियमित जमा करणे आवश्यक आहे. थकीत रकमेचे सभासदांना योजनेचा लाभ घेता येणार नाही.

७. सदर जमा होणारे ठेवीवरील व्याज व संस्था वर्गणी यामधून उपलब्ध होणाऱ्या रकमेतून लाभ रक्कम आदा केली जाईल.

८. सेवानिवृत्तीनंतरच ठेवीची रक्कम संबंधीत सभासदास अदा केली जाईल. त्यावर व्याज मिळणार नाही. सदरची संस्थेकडे जमा असणारी मुद्दल रक्कम आदा केली जाईल.

९. सदर निधीचा स्वतंत्र जमा खर्च केला जाईल.

१०. मयत सभासदांचे बाबतीत वरील ४ ते ६ मधील अटीस पात्र राहून सभासदांचे वारस लाभ घेणेस पात्र राहतील.

११. संस्थेकडील कर्ज रक्कमेची मयत दिनांकाअखेर असणारी येणेबाकी, शेअर्स व अन्य देय रक्कमा जमा घेऊन उर्वरीत रक्कम वरील लाभ रक्कमेतून वसुल करुन शिल्लक रक्कम वारसांना आदा केली जाईल. लाभ रक्कमेतूनही कर्ज बाकी राहत असलेस त्याची वसुली वारस व जामिनदार यांचेकडून केली जाईल.

१२. आपतकालीन स्थितीत उपलब्ध निधीची माहिती घेऊन लाभ रक्कम ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

१३. आजारपणामुळे मयत झालेले सभासदांचे बाबतीत त्याचे वैद्यकिय दाखल्याचा व आजाराचे कारणाचा विचार करुन लाभ रक्कम देणे/न देणे निर्णय घेणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

१४. सदर जमा ठेव रकमेवर तारण कर्ज मिळणार नाही.

सेक्रेटरी चेअरमन

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांची सह.पत.संस्था मर्या. कोल्हापूर